# ऋणनिर्देश

**"हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतातील राग संकल्पना, विकास, आणि आधुनिक युगातील नवरागनिर्मितीच्या तत्त्वांचे विश्लेषण"** हा प्रबंध विद्यापीठात सादर करताना आज मला अतिशय आनंद होत आहे. हा प्रबंध पूर्णत्त्वास नेण्यासाठी मला वेळावेळी ज्यांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांच्या ऋणनिर्देशाशिवाय हा प्रबंध पूर्ण होणार नाही असे मला वाटते.

माझ्या मार्गदर्शिका आणि एस. एन. डी. टी. च्या संगीत विभाग प्रमुख डॉ. श्रीमती नीरा ग्रोवर यांनी मला संपूर्ण अभ्यासकालात निरंतर प्रोत्साहन देऊन प्रत्येक बाबतीत मला सांभाळून घेतले. त्यांनी दिलेल्या अमूल्य सूचनांमुळेच माझ्या लेखनाला एक निश्चित स्वरूप प्राप्त होवू शकले. नवरागनिर्मिती करणाऱ्या अनेक प्रथितयश कलाकारांशी मुलाखतीसाठी संपर्क साधणे मला केवळ त्यांच्यामुळेच सुलभ झाले. त्यांनी स्वतःच्या खाजगी संग्रहातून मला प्रस्तुत विषयासंबंधी अनेक पुस्तके त्वरित उपलब्ध करून दिल्या. ज्या–ज्या वेळी मला त्यांच्या मदतीची आणि मार्गदर्शनाची आवश्यकता भासली, त्या–त्या वेळी त्यांनी मला संपूर्ण सहकार्य दिले.

पं. वि. रा. आठवले, पं. रामाश्रय झा, पं. पंढरीनाथजी कोल्हापुरे, संगीत मासिकाचे संपादक डॉ. मुकेश गर्ग, डॉ. सौ. सुलभा ठकार आदी मान्यवरांचे मार्गदर्शनही मला लाभले. विशेषतः वयोवृध्द संगीतज्ञ पं. वि.रा. आठवले यांच्याकडून नवीन रागांविषयी मला मिळालेल्या माहिती आणि ध्वनिमुद्रणाचा मला प्रस्तुत प्रबंधासाठी लाभ झाला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझी विषयासंबंधीची कल्पना अधिक स्पष्ट झाली.

माझे गुरूजी पं. श्री. केशवरावजी राजहंस (नागपूर), यांनी मला अगदी लहानपणापासूनच अत्यंत ममत्त्वाने संगीताचे शिक्षण दिले आणि माझ्यातील संशोधक वृत्ती वाढीस लावली, त्यांची मी शतशः ऋणी आहे. माझे संगीत शिक्षण ज्यांच्या अथक परिश्रमांच्या परिणामस्वरूप पूर्ण झाले, ते माझे

आई–वडील आणि माझ्या प्रबंध पूर्तीसाठी संपूर्ण सहकार्य देणारे माझे सासू–सासरे आणि पती यांच्या ऋणांतून मुक्त होणे खरोखर कठीण आहे. माझी मुलगी कु. आरोही हिने देखील मला या प्रबंध कार्यात यथाशक्ती मदत केली.

माझ्या प्रबंधाच्या मुद्रित शोधनासाठी प्रा. श्री. प्रवीण शिरगांवकर यांनी, अतिशय व्यस्त असून देखील संपूर्ण सहकार्य केले, तसेच पार्ले येथील श्री. निरंजन लेले यांनीही नवीन रागांचे ध्वनिमुद्रण आणि संपादन करून C.D.s बनविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या दोघांच्याही सहकार्याद्दल मी त्यांची आभारी आहे.

माझ्या प्रबंध विषयासाठी मला अनेक संस्थांची मदत झाली. एशियाटिक सोसायटी, मुंबई, एन.सी.पी.ए. मुंबई, एस.एन.डी.टी.कॉलेज, पुणे, मुंबई, शारदा संगीत विद्यालय, बांद्रा, युनिव्हर्सिटी लायब्ररी नागपूर, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, वाशी, या संस्थांमधील काम करणाऱ्या व ग्रंथालयातील कर्मचारी वर्गाने अतिशय आपुलकीने संदर्भ देण्यासाठी मला सहकार्य केले, त्यांची मी आभारी आहे.

संगीतासारख्या विषयात लिखित साहित्य मर्यादित असल्याने मला अनेक गायक, कलाकार, नवरागनिर्मितीकार यांच्या मुलाखती घ्याव्या लागल्या. या सर्वांनी मला हवी ती माहिती मोकळेपणी उपलब्ध करून दिली, त्यांचेही ऋण मी मानायला हवे. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांनी मला मदत केली, त्याची परतफेड कशानेही होऊ शकणार नाही, याची मला जाणीव आहे. म्हणून त्या सर्वांचा नम्रतापूर्वक उल्लेख करून मी त्यांचे आभार मानते.

प्राचीन जातिगायनापासून ते आधुनिक युगातील नवीन रागांपर्यंत रागसंकल्पनेत झालेल्या विकासाचा अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे. या प्रबंधाद्वारे संगीतप्रेमी लोकांना प्रस्तुत विषयाबद्दल नवीन माहिती उपलब्ध होईल अशी आशा आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या पूर्ततेसाठी, त्यातील अचूकतेसाठी मी यथाशक्ती प्रयत्न केले आहेत. तरीही त्यात काही त्रुटी असतील तर त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करते.

------